# // प्रेसनोट //

**"स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान"**

"स्वस्थ नारी, सशक्त परिवार" महिलांसाठी आरोग्य शिबीर महिलांचे आरोग्य हे संपूर्ण कुटूंब आणि समाजाच्या आरोग्याशी थेट जोडलेले आहे. याच उद्देशाने केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शनाखाली १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर २०२५ या कालावधीत "स्वस्थ नारी, सशक्त परिवार" हे विशेष अभियान राबविण्यात येणार आहे.

तसेच या अभियानाचा राष्ट्रीय शुभारंभ दि.१७/०९/२०२५ रोजी इंदौर, मध्य प्रदेश येथे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते होणार आहे. सदर अभियान कालावधीत मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत मिरा भाईंदर शहरातील प्राथमिक आरोग्य केंद्र, आयुष्यमान आरोग्य मंदिर, महानगरपालिका रुग्णालय या ठिकाणी या अभियानातंर्गत आरोग्य शिबीरे आयोजित केली जाणार आहेत.

**या अभियानाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत: -**

- या अभियानाचा मुख्य उद्देश देशभरातील ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये महिला आणि मुलांसाठी तपासणी व विशेषज्ञ आरोग्य शिबिरे आयोजित करणे असा आहे.
- या मोहिमेत आयुष्मान आरोग्य मंदिरांमध्ये दररोज (AAM-SHC) तपासणी आणि जनजागृती शिबिरे आयोजित केली जाणार आहे.
- मिरा भाईंदर महानगरपालिकेचे रुग्णालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे (AAM-PHC/UPHC) येथे विशेषज्ञाव्दारे तपासणी शिबिरे घेतली जाणार आहे.

या शिबिरांमध्ये विविध आरोग्य सेवा पुरवल्या जातील, ज्यात खालील गोष्टींचा समावेश आहे:

**१. महिलांची आरोग्य तपासणी:-**

- उच्च रक्तदाब आणि मधुमेहाच्या निदानासाठी तपासणी करणे.
- तोंडाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाच्या निदानासाठीची तपासणी करणे.
- जोखीम असलेल्या महिलांसाठी क्षयरोग (Tuberculosis) तपासणी.
- किशोरवयीन मुली आणि महिलांसाठी ॲनिमिया (रक्तक्षय) तपासणी आणि समुपदेशन.

**२. माता आणि बाल आरोग्य सेवा :-**

- गर्भवती महिलांसाठी प्रसूतिपूर्व काळजी (ANC) तपासणी व समुपदेशन करणे.
- हिमोग्लोबिन तपासणी, तसेच पोषण आणि काळजी यावर समुपदेशन.
- बालकांचे आवश्यकतेनुसार लसीकरण केले जाईल.

**३. जनजागृती आणि वर्तणूक बदल संवाद :-**

- किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळीची स्वच्छता आणि पोषणाविषयी जागृती सत्रे आयोजित केली जातील.
- पोषण विषयी समुपदेशन व निरोगी राहण्यासाठी मार्गदर्शन

**४. नोंदणी आणि कार्ड वाटप :-**

- आयुष्यमान भारत डिजीटल मिशन कार्ड (ABDM), पंतप्रधान जन आरोग्य योजना (PMJAY) अंतर्गत नोंदणी व आयुष्यमान वय वंदना कार्ड वाटप सर्व गरजू व पात्र लाभार्थ्यांना करण्यात येईल.

**५. क्षयरोग निर्मुलनासाठी निक्षय मित्र स्वयंसेवकांची नोंदणी :-**

- क्षयरुग्णांना दत्तक घेऊन त्यांना पोषक आहार उपलब्ध करुन देण्यासाठी आणि क्षयरोगाविरुध्द जन आंदोलनाला पाठींबा देण्यासाठी दानशुर व्यक्ती, संस्था आणि संघटनांना निक्षय मित्र बनवून सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. या करिता माय भारत स्वयंसेवक अथवा इतर स्वयंसेवकाच्या मदतीने निक्षय मित्रांची नोंदणी वाढवण्यात येईल, जेणेकरुन क्षयरोग मुक्त भारताचे ध्येय साध्य करणे शक्य होईल.

Scanned with CamScanner

- तपासणी शिबीरामध्ये (Screening camp) मध्ये आवश्यक असणा-या रुग्णांना विशेषज्ञा कडून तपासणी साठी संदर्भित केले जाईल व त्यांच्या आवश्यक त्या रक्त लघवीच्या तपासण्या, सोनोग्राफी, क्षकिरण तपासणी व शस्त्रक्रिया मोफत व नियोजन करुन करण्यात आले आहे.

**६. महानगरपालिका स्तरावरील दि.१७ सप्टेंबर २०२५ रोजीचे उपक्रम :-**

१. या शिबीरामध्ये महिलेसाठी प्रतिबंधात्मक आरोग्य वर्धिक आणि उपचारात्मक सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करुन दिल्या जातील.

२. उच्च रक्तदाब, मधुमेह, स्तन व गर्भाशय मुखाचा कर्करोग, तोंडाचा कर्करोग यासारख्या असंसर्गजन्य रोगाची तपासणी केली जाणार आहे.

३. तसेच रक्तशय तपासणी क्षयरोग व सिकल सेल तपासणी, गर्भवती महिलेची प्रसुतीपूर्व काळजी, माता व बाल संरक्षण कार्ड वितरण तसेच लसीकरण सेवा पूरविण्यात येतील.

४. महिलेसाठी पोषक, मासिक पाळीची स्वच्छता व निरोगी जीवनशैली या विषयी मार्गदर्शन सत्राचे आयोजन होणार असून, रक्तदान शिबीर व मानसिक समुपदेशन करण्यात येईल.

५. याशिवाय आयुष्यमान भारत, ABHA कार्ड व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना यासाठी पात्र नागरीकांची नोंदणी केली जाईल, या अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी समुदायातील महिलांना शिबीराची माहिती संबंधित आरोग्य केंद्र व महानगरपालिका रुग्णालयमार्फत उपलब्ध केली जाणार आहे.

**७. सहभागी संस्था व केंद्र :-**

१. १ मिरा भाईंदर महानगरपालिकेचे रुग्णालय

२. ११ शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र

३. १० आयुष्यमान आरोग्य मंदिर.

तरी महिलांनी मोठ्या संख्येने शिबीरात उपस्थित राहून आपली आरोग्य तपासणी करुन घ्यावी. असे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

(डॉ.प्रमोद पडवळ)
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner